**Review of Research**
International Online Multidisciplinary Journal

ISSN : 2249-894X Impact Factor 3.1402 (UIF) Volume -5 | Issue - 6 | March - 2016

# संतश्रेष्ठ श्रीज्ञानदेवांचे अभंग दर्शन



प्रा. अबोली सुलाखे
संगीत विभाग प्रमुख , श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी.

***प्रस्तावना :***

१३ व्या शतकातील संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी सामान्य जनांसाठी अभंग निर्मिती केली. ज्ञानी प्रज्ञावंतांसाठी श्रीमद् भगवद्गीतेचे तत्वज्ञान ज्ञानेश्वरी च्या रूपात सांगितले. अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, हे देखील त्यांचे तत्वज्ञान, अध्यात्मविषयक ग्रंथ आहेत.

अभंग हा मराठी भाषेतील एक लोकप्रिय छंद प्रकार आहे. अभंग म्हणजे ओवीची गेय माला. याची व्याख्या ज्याला भंग नाही तो अभंग अशी सांगितली जाते. समाजातील सर्व थरांतील लोकांना भक्तीमार्गाकडे, अध्यात्माकडे वळविण्यासाठी त्यांनी अभंग हे प्रभावी माध्यम वापरले. आजपर्यंत श्री ज्ञानेश्वर निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई, संत नामदेव, चोखामेळा, नरहरी सोनार, सेना न्हावी इ. संतांचे अभंग आपल्याला श्रवणाने कंठस्थ झाले व पिढयान्पिढ्या मुखोद्गत राहिले. हे अभंग आपल्या महाराष्ट्राचा सांस्कृतिक व आध्यात्मिक अमूल्य असा ठेवा आहे.

अभंगांच्या इतिहासाबाबत अनेक अभ्यासकांनी आपली मते विचार मांडले आहेत, निवृत्तीनाथांपूर्वी महानुभाव पंथातील चरित्रग्रंथांमध्ये अभंग हा शब्द आल्याचा उल्लेख सापडतो, याबाबत वसुंधरा बनहट्टी ज्ञानदेवांच्या अभंगातील शब्दकळा या पुस्तकात लिहितात की, ज्ञानेश्वरांच्या अभंगरचनेआधी काही महानुभाव चरित्रग्रंथांमध्ये अभंग हा शब्द आल्याचा उल्लेख अभंगवाणीतीन पंथराज या शं.गो. तुळपुळयांच्या पुस्तकात आहे. अभंग म्हणजे ग्रंथाचे कर्तृत्व किंवा कर्तेपण व तद्वाचक कविनामाची मुद्रिका मराठीत अभंगरचनेची

सुरुवात, साधारणपणे निवृत्तिनाथांपासून झाली. ज्ञानदेव हे निवृत्तिनाथांचे बंधु आणि शिष्य. त्यांनीही मराठी काव्याला अभंगाचा साज चढविणे साहजिकच होते वास्तविक अभंग हा तीन अक्षरांचा साधासुधा शब्द, कानामात्राही नसलेल. पण त्याने आपले अ-भंग हे नाव मराठी काव्यात सार्थ केले आहे.

अभंग वाणीतील पंथराज या पुस्तकातील अभंगांचा विकास या प्रकरणात डॉ.शं..गो. तुळपुळे म्हणतात, अभंग रचनेला प्रारंभ निवृत्तिज्ञानदेवापासून प्रारंभ झाला असला तरी, त्यांपैकी कोणी अभंग छंदाविषयी लिहिले नाही. ज्ञानदेवांच्या (अभंग) छंदाविषयी लिहिले नाही. ज्ञानदेवांच्या अभंग रचनेवरून , इतके मात्र कळते की त्यांच्यावेळी अभंगरचनेला नुकताच प्रारंभ झाला असल्याने, या काव्यप्रकाराला आकार कसा आलेला नव्हता. व त्यामुळे त्यांचे बरेच अभंग रचनादृष्ट्या विस्कळीत वाटतात. या अभंग रचनेबाबत व अभंग निर्मितीबाबत श्री.प्रं.न.जोशी यांनी ज्ञानेश्वरांचे निवडक अभंग या पुस्तकात १३,१७ वर लिहले आहे की,पंढरीचा विठ्ठल हा समचरण म्हणून लौकिकास पात्र झालेला आहे. पांडुरंग हा विटेवर समवरणांनी त्रिभंग नव्हे तर अभंग अशा अवस्थेत उभा आहे. या अभंगाविठ्ठलाची अनुभूती वर्णन करणारा छंदही अभंगच बनला. समचरणीं अभंग । नव्हे तालछंदोभंग । असे नामदेवांनी म्हटले आहे. विठ्ठल जसा समचरण तसाचअभंगही समचरणच. सोळा अक्षरे असलेल्या दोन समचरणांनी अभंग तयार होतो असे नामदेवांनी म्हटले आहे. दुसऱ्या एका अभंगात बावीस अक्षरसंख्या असलेल्या रचनेचाही त्यांनी निर्देश केला आहे. मराठी संतांच्या या दोन प्रकारच्या अभंगांना छंदशास्त्रकारांनी देवीवर व देवद्वर अशी नावे दिली आहेत. अर्थाततच प्रारंभीच्या काळात ही अभंगरचना अतिशय शिथिल असली, तरी परमात्म्याच्या अनुभूतीचे प्रत्ययकारी दर्शन घडविण्यास ती समर्थ अशीच आहे. वस्तुनिष्ठ वर्णन अभंगाला फारसे मानवत नाही, ईश्वरी प्रीतीने भरलेल्या अंतरंगाचा सहज सुंदर आविष्कार म्हणजे मराठीतील अभंगरचना होय.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी, अनुभवामृत, चांगदेवपासष्टी व नंतर अभंग लिहिले. संतमंडळींच्या विशेषतः नामदेवांच्या सहवासात ज्ञानेश्वरांचे भक्तिप्रेम उफाळून आले व त्यांच्या मुखातून अभंगवाणी स्फुरली, असे सामान्यतः मानले जाते. नामदेवांच्या आदि या प्रकरणात ज्ञानेश्वरांसंबंधी म्हणताना त्यांनी लिहिले आहे :

अध्यात्म ग्रंथ पाहती पैठणीं । गीता संबोधिनी जवळीं असे ।
सांगती पुराण रात्रीं हरिकीर्तन । पैठणींचे जन वेधियेले ।।

नामदेवांच्या या पुराव्यावरुन ज्ञानेश्वरांनी पैठणच्या मुक्कामात असताना, हरिकीर्तन करीत असताना काही अभंगांची रचना केली असावी, असा तर्क निघतो.

नामदेवांच्या संगतीत तीर्थयात्रा करून आल्यावरच विठ्ठलभक्त संतांच्या मेळाव्यात खेळीमेळीने वावरत असता, ज्ञानेश्वरांच्या अभंगांची रचना झाली. अभंगांत मोकळेपणा अधिक असतो. अभंगांची भाषा सुलभ आहे . ज्या मुखातून ज्ञानेश्वरी प्रकट झाली, तेच व्यापक ज्ञान तोच भगवद्‌शक्तीचा जिव्हाळा, तेच स्वात्मसुखाचे उद्‌गार —दोहींकडे एकच हृदय, एकच भाषापध्दती, एकच कवित्व,

महानुभाव पंथातील चरित्रग्रंथामधे अभंग या शब्दाचा उल्लेख ओवीच्या माध्यमातून केला आहे पण खरे त्याचे स्वरूप अभंगासारखे आहे. याबाबत डॉ.श्री.रं. कुलकर्णी यांनी ओवी ते लावणी पुस्तकात पृ. ७४,७५ वर दाखले दिले आहेत. ते लिहितात, मातृकी -रूक्मिणी स्वयंवर आणि अन्यत्र आलेल्या महानुभाव पंथातील ओव्या अभंगाच्या धाटणीत गाता येतात. ग्रंथकाराच्या दृष्टीने मात्र त्या ओव्या आहेत. वारकरी संप्रदायातील काही रचनातूनही ओवी आणि अभंग यांची अशीच सरमिसळ झालेली दिसते. तथापि, अभंग आणि ओवी हे पृथक् छंद आहेत याची जाणीव या पंथातील कवींना आहे. महानुभाव पंथात मात्र अभंगाच्या धाटणीत झालेल्या रचनांनाही ओवी याच नावाने संबोधण्यात आलेले आहे. महानुभावीय ओवी आणि वारकरी अभंग उद्धृत करण्यात येत आहेः

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ती चारी साधियेल्या ।।१।।
हरि मुखें म्हणा, हरि मुखें म्हणा ।।२।। पुण्याची गणना कोण करी ।।३।।
अंसोनि संसारी जिव्हे वेगु करी । वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ।।४।।
ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणे । द्वारकेचे राजे पांडवा घरी ।। -ज्ञान ५।।अ.क्र.७५३,पृ२५९.

महादाइसेने गाइलेल्या ओव्या लीळाचरित्रात आल्या आहेत. त्यांपैकी दोन ओव्या वरील अभंगाशी पडताळून पाहता येतील :

अक्रूरे मंगळे लवति पिंगळे । कृष्णसंध्यावेळे भेटतील
अक्रूरे घातली सगुण गांठी । आजि द्वारके रायेसी होईल - लीच.दण्४२७

ओवीच्या नावावर अभंग मिरवला तो केवळ महानुभाव पंथातच नव्हे. महानुभावेतर वाङ्‌मयात देखील असा प्रकार आढळतो. दासोपंतांच्या देवघरात दासोपंतविरचित पदे, ओव्या, आरत्या इ नित्यपूजेत गाण्यात येणाऱ्या रचनांचा संग्रह प्रकाशित झालेला आहे. या

संग्रहात अधूनमधून ओव्या देतात. या ओव्या नसून वस्तुतः अभंगच आहेत. ओव्या हे शीर्षक देण्यात उत्तरकाळात प्रमाद घडला असेल अशी शंका आल्यावरून या ओव्यांचा अभ्यास केला असताना स्वतः ग्रंथकारासही ओवीछंद अभिप्रेत होता असे अंतर्गत पुराव्यावरून निदर्शनास आले. सोमवारच्या आरतीच्या प्रसंगी गावयाच्या ओव्यात स्वतः कवीनेच त्या ओव्या असल्याचे नमूद केले आहे. वस्तुतः ते अभंग आहेत.

रूप तुझें दिसे, चंदन उवरिला । सुभक्त पुजिला मनोहर ।।१।।
मनोहररूप, सावळा श्रीपति । चामर ढळती दोहीकडे ।।२।।
दोहीकडे शाम, चालक सेवक । पुढेची दायक आळविती ।।३।।
श्रम करा करू, कर्म हे कासया । मुक्तीची वोविया प्रसविती ।।८।।१३

ज्ञानेश्वरांचे आराध्य दैवत — पंढरपूरचा पांडुरंग, या विठ्ठलाच्या भक्तीत रंगून त्यांनी त्यांच्या मनातील भावभावना अभंगातून चितारल्या. ज्ञानदेवांची वाणी अमृत, मधुर, रसाळ आहे साच आणि मवाळ अशी आहे. माझा मराठाचि बोलु परि अमृताते पैजा जिंकेन अशा भावनेने मराठीत अभंग रचना केली. त्यांच्या विठ्ठल प्रेमाचे, ईश्वर प्रेमाचे अनुभव म्हणजे अभंग. ही त्यांची पारमार्थिक भावगीते आहेत. त्यांच्या मनातील विविध भावना अभंगातून व्यक्त झाल्या.

अभंग, ओवी हे प्राकृत छंद आहेत. परमात्म प्रीतीचा, ईश्वरप्रेमाचा भक्तीचा आलेला अनुभव व्यक्त करण्यासाठीच जणू अभंग निर्मिती झाली संत ज्ञानदेव आणि संत नामदेव समकालीन. हे दोन्ही संत ज्ञान आणि भक्ती यांचे मुकुटमणी मानले जातात. याच काळातील कन्नड कवी चौडरस विठ्ठलाला अभंग विठ्ठल म्हणतो व त्यांचे वर्णन अभंग विठ्ठल परि । मना सांडी विपय खोडी । सिंधु तो अभंग विठ्ठल अशा शब्दांत करतो.

अभंगनिर्मिती तीर्थयात्रेच्या वेळी संतांच्या सहवासात झाली त्यांनी तीर्थयात्रा भारतभर केल्या याचे वर्णन त्यांनी त्यांच्या अभंगातून केले आहे. मी तीर्थयात्रा केल्या पण मला भगवंताच्या पायाची वीट होण्याचे भाग्य मात्र लाभले नाही या शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या त्यांचा अभंग श्री ज्ञानदेव गाथा, संग्रहक श्री नाना महाराज साखरे अ.क्र. ७५ पृ.७८ वाराणसी यात्रे जाईन । प्रयाग तीर्थ पाहीन ।। त्रिवेणिये स्नान करीन । परि मी वीट नव्हेन ।।१।। विठोबा पाईची वीट । मी कइंबा होईन ।।ध्रु ।।

अभंग निर्मितीमागे त्यांचे प्रेरणास्थान त्यांचे सद्गुरु, वडील बंधु, श्री निवृत्तीनाथ होते. त्यांच्या कृपाप्रसादाने त्यांनी वाङ्मय निर्मिती केली. त्यांच्या मनात निवृत्तिनाथ त्यांचे गुरु मात गुरु पिता असे होते ते म्हणतात श्रीगुरु सारिखा असता पाठिराखा । या संदर्भात डॉ. वसुंधरा बनहट्टी यांनी ज्ञानदेवांच्या अभंगातील शब्दकळा या पुस्तकात पृ १६४,१६५ वर श्री भा.पं. बहिरट ज्ञानेश्वर व वारकरी संप्रदाय यांच्या लेखातील माहिती दिली आहे. त्यानुसार त्या लिहितात, ज्ञानदेवांचे वडील विठ्ठलपंत व मातुश्री रुक्मिणी यांचा विवाह झाल्यावर सिध्दोपंतांनी दोघांना कुलदैवताच्या दर्शनास (विठ्ठल ) पंढरपूरी आणले. ज्ञानेशांचे वडील विठ्ठलपंत यांच्या काळी वारीची पद्धत होती व विठ्ठलपंतांकडून ती पाळली जाण्याची शक्यता होती हे उघड होते. ज्ञानदेवांच्या घराण्यात विठ्ठल उपासना चालू होती. गुरु निवृत्तिनाथांनी त्यांच्यात प्रेममुद्रेद्वारे परमात्मप्रेमाचा संचार करून ईश्वरी प्रेमाचा स्थायीभाव यांच्यात निर्माण करून दिला होता. या प्रेमभक्तीच्या अंतर्बाह्य संस्कारामुळे ज्ञानदेवांची कायावाचामनोबुध्दि पुनीत होऊन त्यांची व्यक्तीत्व झळाळले होते. ह्या व्यक्मिमहत्त्वाची, त्यांच्या भक्मिय विठ्ठलप्रेमाची आणि प्रेममय विठ्ठलभक्तीची उघड अभिव्यक्ती त्यांच्या सर्व अभंगांतून दिसते.

देवद्वार व देवीवर या दोन अभंगाच्या प्रकारांबाबत डॉ.श्री.रं.कुलकर्णी यांनी ओवी ते लावणी या पुस्तकात माहिती पृ ८२ वर दिली आहे.ते लिहितात, अभंगाची कळा नाही मी नेणत असे सांगूनही नामदेवांनी अभंगाचे लक्षण दिले आहे. (नाम १३८२) या लक्षणानुसार अभंग दोन प्रकारचा ठरतो. यासच ना.ग. जोशी लहान व मोठा अभंग मानून देवद्वार आणि देवीवर असे अनुक्रमे त्यांचे नामकरण करतात. देवाचियाद्वारी उभा क्षणभरी हा संत ज्ञानदेवांचा अभंग देवद्वार जातीचा असून नामदेवांचा पुढील अभंग देवीवर छंदात बसतोः

खवळलो आता न भिये रे तुज
सांडिली रे लाज लौकिकाची ।। १३८३ ।।

ज्ञानेश्वरांनी सगुण निर्गुणपर अभंगाद्वारे त्यांचा चिद्‌विलासवाद व्यक्त केला आहे याबाबत श्री.प्र.न. जोशी ज्ञानेश्वरांच्या निवडक अभंग या पुस्तकात पृ ३१वर माहिती देताना लिहितात की, व्यक्त प्रभूच्या अवीट लीला ज्ञानदेवांनी वर्णन केल्या आहेत. हा प्रभू व्यक्त झाला नसता, तसाच अव्यक्त राहिला असता, तर त्यालाच करमेनासे झाले असते. तोच प्रकट होण्यासाठी, लीला करण्यासाठी , विलासासाठी उत्सुक बनला आणि हे सर्व व्यक्त व साकार सगुण जगत दिसू लागले. या जगतात प्रभूचे सूत्र आहेच. पण तो व्यक्त झाल्यामुळे खुलला. जगतास शोभा आली. व्यक्त सृष्टीपैकी आनंद झाला आणि व्यक्त होणारा प्रभूही सुखावला. अशी ही चिद्‌विलासाची अद्‌भुत किमया आहे.

ज्ञानदेव हे महान संत होते. उदार लोकवादी, करुणामय प्रेममय असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. ते सऱ्हदयी, संवेदनशील होते. संत या शब्दाचा अर्थ डॉ. वसुंधरा बनहट्टी यांनी ज्ञानदेवांच्या अभंगातील शब्दकळा पुस्तकात पृ.१६५ वर दिला आहे त्या लिहितात, ज्ञानदेवांचा व्यक्तिविशेष म्हणजे त्यांचे संतत्व. संत कोणाला म्हणावे? तर ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायाच्या पसायदानात ज्ञानदेवांनी विश्वात्मक देवाजवळ लोकांसाठी जे मागणे सांगितले आहे, तीच इच्छा मनात असेल तो संत. तो हरिभक्त तर असावाच पण जगातून पाप नाहीसे व्हावे, सर्वांनी सत्कर्म करावे, सर्वांनी एकमेकांवर प्रेम करावेच पापाचा अंधःकार जगातून नाहीसा व्हावा, विश्वात स्वधर्म नांदावा, सर्वांना त्यांच्या सदिच्छेचे फळ मिळावे, सगळे ईश्वरांच्या पायाशी सश्रध्द असावेत, सर्वजण सद्‌वर्तनी होऊन त्या आदिपुरुषाच्या चरणाशी परमेश्वर चरणाशी, लीन व्हावेत ही इच्छा ज्यांची आहे ते खरे संत. ज्ञानेश्वरादि सर्व मराठी संतांनी आपले जीवन हीच इच्छा कृतीत आणण्यासाठी वाहिले. दया, क्षमा, शांती, भक्ती ही संतलक्षणे होत.

ज्ञानेश्वरांच्या काळात अभंग हे प्रभावी माध्यम लोकशिक्षणासाठी त्यांनी वापरले कारण बहुजन समाज शिक्षणापासून दूर होता या समाजाला शिक्षित करणे हा फार मोठा प्रश्न समोर असल्याने श्रवणाच्या माध्यमांतून लोकशिक्षण करण्यासाठी अभंगनिर्मिती केली. हा त्यांचा हेतू डॉ. यू.म. पठाण यांनी श्री ज्ञानेश्वर नवदर्शन पुस्तकात ज्ञानेश्वरीच्या जन्मखुणा या लेखात पृ ५६ वर दिला आहे. या लेखाचा उल्लेख वसुंधरा बनहट्टी यांनी ज्ञानेश्वरांच्या अभंगातील शब्दकळा या पुस्तकात पृ वर केला आहे त्यानुसार त्या लिहितात की विशेषतः अभंगाचा श्रोता हा ज्ञानेश्वरींच्या श्रोत्यापेक्षाही दीन, भाबडा, होता. म्हणून अभंगात लोकमानसाच्या दृष्टीने रचना अधिक आहे.

ज्ञानेश्वरांनी अभंग निर्मिती करताना काव्यसौंदर्य, शब्दसौंदर्य, भावनिक सौंदर्य, रूपसौंदर्य इ विचार केला. ज्ञानदेवांना भक्ती, परमार्थ, साक्षात्काराचे अनुभव, पारमार्थिक अनुभव पोचवायचे होते आपल्या पंचेंद्रियांना जाणवतील अशा भाषेत सांगताना शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यांना व्यक्त करणाऱ्या सुंदर, नादपूर्ण, भावयुक्त शब्दांचा वापर त्यांच्या मनातील तरल भावना व्यक्त करण्यासाठी केला आहे. या संदर्भात डॉ. वसुंधरा बनहट्टी यांनी या अभंगांची उदाहरणे दिली आहेत ती उधृत करीत आहे पृ ७२ वर विठ्ठलासाठी काळा, सावळा, निळा या रंगाचा वापर केला आहे - सावळे सगुण (१९.३) अंतरी सावळा (२७.६) डोळसु सावळा)४४.३ सतत कृष्णमूर्ति सावळे (१८९.४). निळा रंग व्यक्त करण्यासाठी पृ ७७ वर –निळियेच्या निशी, विरहिणी पिशी । ज्ञानदेव सांगे निळियेचे बागे। निळासंगे ओळले गे निळीमाजी ।। (२७०.४).

गंधाचे अभंग पृ ८४, ८५ वर दिले आहेत. कापुराची वाती, उजळली ज्योति ठायीच समाप्ती झाली तैसी । (५३.१.२).

अंगी चंदनाची उटी, ते देखोनि मन संतुष्टी । २०६.८

स्पशावाचक शब्द अभंगात देताना पृ ९१,९२ वर घन वाजे घुणघुणा वारा वाजे रूणझुणा (२६३), अवचिता परिमळु झुळकला अळुमाळु । मी म्हणे गोपाळु आला ।(२७५.१)

तृप्ती गोडी या संदर्भात दिलेले अभंग पृ ९६,९७ वर आहेत त्यानुसार अमृत जेविला अमृते आंचवला । सेजे विसावला निरालंबी । अधरीचे अमृत की सुधारसु मुराला तोचि नादु सुस्वरू । (३१.९)

ज्ञानदेवांनी त्याच्या अभंगात सांगीतिक सौंदर्याने युक्त नाद पूर्ण शब्दांचा वापर केला आहे उदा – विठाई किठाई माझे कृष्णाई कान्हाई । रंगा येई वो येई, दडदड दडदड दुडदुड दुडदुड पळ सुटला कळिाकाळा बापुड्या, राम बरवा कृष्ण बरवा सुंदर बरवा बाइयांनो इ.

१३ व्या शतकात ज्ञानेश्वरांसारख्या युगपुरुषाने १३ व्या शतकात अत्यंत उच्च दर्जाची वाड्मय निर्मिती केली. संत ऱ्हदयाच्या ज्ञानेश्वरांनी समाजाचे निरीक्षण अंतर्मुख होऊन केले त्यातील दुःख, संकटे, त्रास, अगतिकता, दारिद्रय, इ. अनेक प्रश्नांनी घेरलेल्या समाजमनावर प्रेमाची, ईश्वर भक्तीची फुंकर घातली.

श्रीभगवान कृष्णांनी सांगितलेले भगवद्‌गीतेतील जीवनाचे तत्वज्ञान त्यावर ज्ञानेश्वरी हे भाष्य केले. गेय स्वरूपातील अभंग निर्मिती मधून विविध विचार, विविध प्रसंग, घटनांनी निर्माण झालेले मांडले. अभंग निर्मिती एका ठिकाणी बसून झाली नाही तर ती तीर्थयात्रा करताना समाजाचे अवलोकन करताना झाली. मनातील सर्व भावना, विचार, अभंगातून कीर्तनाच्या माध्यमातून प्रभावीपणे संगीताच्या अवगुंठनातून पोचले. शब्द व स्वर शक्तीचा संगम अभंगातून दिसतो याचे शब्दसौंदर्य, भावसौंदर्य, गुणसौंदर्य आजच्या काळापर्यंत म्हणजे जवळजवळ सातशे आठशे वर्षे वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून जिवंत आहे म्हणूनच त्यांनी दिलेला जगण्याचा मंत्र म्हणत या लेखाला समाप्त करते.

। रामकृष्णहरि ।

**संदर्भ ग्रंथ –**

१) श्री ज्ञानेदव गाथा - श्री. नाना महाराज साखरे प्रा. अबोली सुलाखे

२) ओवी ते लावणी - श्री. रं.ग. कुलकर्णी संगीत विभाग प्रमुख

३)ज्ञानेश्वराचे निवडक अभंग- श्री. प्र.न. जोशी श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी

४) ज्ञानंश्वरांचे निवडक अभंग - वसुंधरा बनहट्टी